नागपूर उड्डान क्लब, नागपूर या कार्यालयातील कंत्राटी पध्दतीवर भरावयाच्या "मुख्य उड्डान निदेशक" या पदाचे वेतनमान सुधारीत करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन

सामान्य प्रशासन विभाग

शासन निर्णय क्र. विचासं- १११८/प्र.क्र.१६७/२८-अ

हुतात्मा राजगुरू चौक, मादाम कामा रोड,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक : ३ ऑगस्ट, २०१९

<u>वाचा:</u>- १) शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग क्र.एनएफसी-१००३/प्र.क्र.९/२००३/२८-अ, दिनांक २१.१२.२००६
२) शासन निर्णय क्रमांक एफएफसी-१००७/प्र.क्र.२०६/२८-अ, दि.१५.१.२००८
३) नागपूर उड्डाण क्लब यांचे दिनांक २७.१०.२०१८ व ३०.४.२०१९ चे पत्र
४) मा.उच्च न्यायालय, नागपूर खंडपीठ येथे दाखल PIL No.१३/२०१६ प्रकरणी मा.उच्च न्यायालयाचे दि.१९.०७.२०१९ रोजीचे आदेश
५) शासन समक्रमांक निर्णय दि.८ जुलै,२०१९

<u>प्रस्तावना :-</u>

संदर्भ क्र.१ मधील दिनांक २१.१२.२००६ च्या शासन निर्णयान्वये नागपूर उड्डाण क्लब पुन्हा सुरु करण्यासाठी मान्यता देण्यात आली. याअनुषंगाने नागपूर उड्डाण क्लब या कार्यालयाकरीता कंत्राटी पध्दतीवर मुख्य उड्डाण निदेशकाच्या पदासह तांत्रिक अधिकाऱ्यांची ९ पदे भरण्यास मान्यता देण्यात आली. सदर शासन निर्णयान्वये मुख्य उड्डाण निदेशकाच्या या पदासाठी दरमहा रु.१.०० लक्ष वेतन आणि इतर अनुषंगिक भत्त व सुविधा तसेच दिनांक १५/१/२००८ च्या शासन निर्णयान्वये दरमहा रु.३.५० लक्ष सुधारीत वेतनमान मंजूर करण्यात आले होते.

२. विदर्भ भागातील नागपूर उड्डाण क्लब ही विमान चालविण्या सबंधी शिक्षण देणारी तसेच विमान चालविण्याचे शिक्षण घेण्यात प्रोत्साहन देणारी संस्था आहे. नागपूर उड्डाण क्लब चालविण्याच्या दृष्टीने मुख्य उड्डाण निदेशक हे पद महत्वाचे असून दिनांक १५/३/२०१८ पासून रिक्त असल्यामुळे उड्डाण प्रशिक्षण बंद आहे. संदर्भाधीन दिनांक १५/१/२००८ च्या शासन निर्णयान्वये मंजूर केलेल्या दरमहा ३.५० लक्ष इतक्या कमी वेतनावर वारंवार जाहीरात देऊनही प्रतिसाद मिळत नसल्यामुळे सदर पद भरता आलेले नाही. यास्तव मुख्य उड्डाण निदेशकाच्या दिनांक १५/१/२००८ च्या शासन निर्णयातील रु.३.५० लक्ष वेतनात सुधारणा करण्याबाबत प्रस्ताव वित्त विभागास सादर करण्यात आला होता. सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने नागपूर उड्डाण क्लब या कार्यालयाच्या मुख्य उड्डाण निदेशक या पदाच्या वेतनात दरमहा एकत्रित रु.५.०० लक्ष अशी सुधारणा करण्यास वित्त विभागाने मान्यता दिली होती. यानुसार, सदर पदाच्या वेतनात रु.३.५० लक्ष ऐवजी दरमहा एकत्रित (**वेतन + अनुषंगिक भत्ते व सुविधा** अशी विभागणी करुन) खालीलप्रमाणे रु.५.०० लक्ष अशी सुधारणा शासन निर्णय दि.८.०७.२०१९ अन्वये करण्यात आली होती.

अ.क्र.	तपशिल	रक्कम
१	वेतन	३.०० लाखापर्यंत
२	इतर अनुषंगिक भत्ते/सुविधा	दरमहा रु.५०,०००/- पर्यंत
३	उड्डान भत्ता	६०० रुपये प्रति तासाप्रमाणे रु.१.५० लाखापर्यंत (५१ तासापासून)

३. तथापि, मा.उच्च न्यायालय, नागपूर खंडपीठ येथे दाखल PIL No.१३/२०१६ प्रकरणी मा.उच्च न्यायालयाने दि.१९.०७.२०१९ रोजी नागपूर उड्डाण क्लब या कार्यालयाच्या मुख्य उड्डाण निदेशक या पदाचे एकत्रित वेतनमान रु.५.०० लक्ष करण्याबाबत दिलेल्या आदेशाच्या अनुषंगाने शासनाने पुढीलप्रमाणे निर्णय घेतला आहे.

शासन निर्णय :-

सदर प्रकरणी समक्रमांकाचा दि.८ जुलै २०१९ रोजी निर्गमित करण्यात आलेला शासन निर्णय याद्वारे रद्द करण्यात येत आहे.

२. नागपूर उड्डाण क्लब, नागपूर या कार्यालयातील दिनांक २१.१२.२००६ च्या शासन निर्णयान्वये मंजूर केलेले मुख्य उड्डाण निदेशकाचे १ पद करार पध्दतीने भरण्यासाठी आणि सदर पदाकरीता वेतन, सर्व भत्ते व सुविधा यासाठी **एकत्रित दरमहा रु.५.०० लक्ष** असे सुधारीत वेतनमान मंजूर करण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे.

३. सदर खर्चासाठी तहसिलदार (सामान्य प्रशासन) विभागीय आयुक्त कार्यालय, नागपूर यांना आहरण व संवितरण अधिकारी व विभागीय आयुक्त, नागपूर यांना नियंत्रक अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे.

४. हा शासन निर्णय वित्त विभागाच्या सहमतीने अनौ.सं.क्र. ४२/२०१९/व्यय-४, दि.२४.१.२०१९ अन्वये निर्गमित करण्यात येत आहे.

५. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक क्र. २०१९०८०३१४३८३१०७०७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

BHARAT BUDHAJI GAWADE

Digitally signed by BHARAT BUDHAJI GAWADE
DN: c=IN, st=Maharashtra, 2.5.4.20=bc303d0b23c9b2e6456454666136340Oc4a360e6c6fbdefca273e2f5d2a43be7, postalCode=400032, street=MANTRALAYA MUMBAI, serialNumber=af4e3993e4dd3610fcb21aece361e641ad3d33d96f04d57673c4fca72eb10c92, ou=GAD, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, cn=BHARAT BUDHAJI GAWADE
Date: 2019.08.03 14:47:22 +05'30'

(भ. बु. गावडे)
सह सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. विभागीय आयुक्त, नागपूर विभाग, नागपूर.
२. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) / (लेखा परिक्षा) महाराष्ट्र राज्य, नागपूर.
३. जिल्हा कोषागार अधिकारी, नागपूर.

४. अधिदान व लेखा अधिकारी, नागपूर
५. निवासी लेखा परिक्षा अधिकारी, नागपूर
६. कार्यासन व्यय ४, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
७. सामान्य प्रशासन विभाग / कार्या.२५, मंत्रालय, मुंबई.
८. निवडनस्ती, सा.प्र.वि. कार्या.२८-अ.